दैनिक
# लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
dainiklokaarambh@gmail.com
LOK AARAMBH
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले
बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | शुक्रवार ४ एप्रिल २०२५ | अंक ११३ • पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

मनुष्य फक्त भाकरीवर जगू शकत नाही, त्याला थोडे मायेचे बळ लागते.




# डूब गये अहंकार मे सारे, अब तो सुधर जावो प्यारे

## एकनाथ शिंदेंची यवतमाळमध्ये जोरदार फटकेबाजी



**यवतमाळमध्ये बोलताना एकनाथ शिंदे यांनी जोरदार फटकेबाजी केल्याचं पाहायला मिळालं, त्यांनी पुन्हा एकदा नाव न घेता उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे.**

### मी दिलेलं या हाताचे या हाताला कळत नाही

• मी दिलेलं या हाताचे या हाताला कळत नाही. मला तुकाराम महाराज पुरस्कार प्रदान केला. तुमचा आशीर्वाद व शुभेच्छांमुळे हे सर्व शक्य झालं. तुम्ही आहात म्हणून सगळे पुरस्कार आहेत. सर्वसामान्य लोकांसाठी मी एक कार्यकर्ता आहे. मी रक्ताच्या शेवटच्या थेंबापर्यंत सर्वसामान्य लोकांची सेवा करेल, सत्ता येते, जाते, पद येते जाते. पण मला लाडका भाऊ ही ओळख मिळाली, हे माझ्यासाठी सगळ्यात मोठं पद आणि मान आहे, असं एकनाथ शिंदे यांनी यावेळी म्हटलं आहे.

यवतमाळमध्ये बोलताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुन्हा एकदा विरोधकांवर जोरदार हल्लाबोल केला आहे. त्यांनी शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांना खोचक टोला लगावला आहे. हे तुमचं सरकार आहे, आमचं सरकार म्हणजे नो रिजन ऑन द स्पोट डिसिजन आहे. प्रत्येक कामाला रिजन देणाऱ्यांचा सिझन आता संपला आहे. लोकसभा निवडणुकीत फेक नरेटिव्ह केला. विधानसभेत आता आपलंच सरकार येईल म्हणून फाईव्ह स्टार हॉटेलचं बुकिंग केलं. याला जेल मध्ये टाकू हे करू बर्फावर झोपून मारू असे म्हणत होते, मात्र त्यांचे हॉटेल बुकिंग लाडक्या बहिणींनी रद्द केले. डूब गये अहंकार मे सारे, अब तो सुधार जावो प्यारे, असा खोचक टोला यावेळी एकनाथ शिंदे यांनी नाव न घेता लगावला आहे. दरम्यान पुढे बोलताना त्यांनी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेबाबत देखील मोठं वक्तव्य केलं आहे. लाडक्या बहिणींना पायावर उभे करायचे आहे, लखपती बनवायचे आहे. आम्ही सोन्याचा चमचा घेऊन जन्माला आलो नाही, पण आम्हाला सर्वसामान्य माणसांच्या आयुष्यात सोन्याचे दिवस आणायचे आहेत. आज शंभर दिवस झाले, सरकार वेगानं पळत आहे.

## गणपती, इतर देवी-देवतांच्या फोटोंचे घिबली म्हणजे अपमान,

सध्या सर्वांच्या फोनमध्ये, व्हॉट्सअप स्टेटसपासून ते अगदी डिपीपर्यंत दिसतात ते घिबली आर्ट फोटो. अगदी सामान्यांपासून ते सेलिब्रिटींपर्यंत सर्वांनाच घिबलीचे वेड लागले आहे. मात्र या तंत्रज्ञानाचा किंवा या आर्टचा गैरवापर करून व्यंगात्मक विडंबन होण्याची शक्यता नाकारात येत नाही त्यामुळे गणपती व इतर देव – देवतांच्या छायाचित्रांचे 'घिबली आर्ट' करू नका, असं आवाहन लालबाग सार्वजनिक उत्सव मंडळाने केले आहे. घिबली आर्ट'मधील फोटोंनी सोशल मीडियावर धुमाकूळ घातलाय घिबली आर्ट'मधील फोटोंनी सोशल मीडियावर धुमाकूळ घातलाय. सर्वांमध्येच या आर्टबद्दल एक कुतूहल निर्माण झाले आहे. या कुतूहलापोटी अनेकजण गणपतीच्या छायाचित्रांचेही घिबली आर्टमध्ये रूपांतर करीत आहे. विविध संकल्पनांवर आधारित आकर्षक व लक्षवेधी देखावे आणि मूर्तिकारांनी कल्पकतेने घडवलेल्या भव्य गणेशमूर्ती हे मुंबईतील सार्वजनिक गणेशोत्सवाचे मुख्य आकर्षण. त्यामुळे अनेकजण मुंबईचा गणेशोत्सव 'घिबली आर्ट'मध्ये करण्यासाठी उत्सुक असणारचं आणि फक्त गणेशोत्सवच नाही तर इतर देवी-देवतांचे सण, फोटो हे घिबली आर्टमध्ये केले जात असल्याचंही समोर आलं आहे.

## खोक्या भोसलेला वन विभागाच्या कोठडीत मारहाण, वकिलाच्या दाव्यानंतर कोर्टाचा मोठा निर्णय!

गेल्या काही दिवसांपासून बीड जिह्ला अनेक कारणामुळे चर्चेत आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर या जिल्ह्यातील अनेक गुन्हेगारी प्रकरणं समोर आली आहेत. याच काळात सतीश भोसले उर्फ खोक्याचेही कारणामे समोर आले. त्यानंतर आता हा खोक्या तरुंगात आहे. पोलिसांच्या ताब्यात आहे. असे असतानाच आता या खोक्याला वन विभागाच्या कोठडीत असताना मारहाण झाल्याचे म्हटले जात आहे. या मारहाणीचे फोटो व्हायरल जाल्यानंतर आता खोक्याला पुन्हा न्यायालयीन कोठडी देण्यात आली आहे. नेमकं काय घडलं? मिळालेल्या माहितीनुसार वन विभागाच्या कोठडीत खोक्या भोसले याला मारहाण झाल्याचा दावा केला जातोय. खोक्याच्या वकिलाने तसा दावा केला आहे. खोक्याला मारहाण झाल्यानंतर वळ उठल्याचे कथित फोटो व्हायरल झाले आहेत. या मारहाणीच्या दाव्यानंतर आता खोक्या भोसलेले पुन्हा एकदा न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. खोक्या भोसले याला न्यायालयीन कोठडी सकाळपासून खोक्या उर्फ सतीश भोसले याला वन विभागाने ताब्यात गेतले होते. ताब्यात घेतल्यानंतर त्याला मारहाण झाल्याचे त्याच्या वकिलाने म्हटले आहे. समोर आलेल्या फोटोंचा आधार घेत वकिलाने सतीश भोसले याला न्यायालयीन कोठडी द्यावी, अशी मागणी केली. वकिलाची ही मागणी न्यायालयाने मान्य केली आहे. खोक्यावर नेमके आरोप काय आहेत? गेल्या काही दिवसांपूर्वी खोक्या भोसले चांगलाच चर्चेत आला होता.\



वक्फची जमीन ही कोणाचीही जमीन नाही. वक्फची जमीन ही परंपरेने दानात दिलेल्या जमिनी आहेत. आपल्याकडे काही सातबारे हे रामाच्या नावाने आहेत. काही सातबारे विठ्ठलाच्या नावावर आहेत. काही पांडुरंगाच्या नावावर आहेत. या देवस्थानाच्या जमीन आहेत. त्याची विल्हेवाट लावता येत नाही. परंतु महाराष्ट्रात देवस्थानच्या जमिनी खाल्ल्याचे देखील प्रकार आहेत. ते कोणी खाल्ले हेही सर्वांना माहिती आहे. देवस्थानच्या जमिनीची लूटमार सुरू आहे, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी केले.

## केज तालुक्यात विज पडून एका शेतकऱ्या सह गाईचा मृत्यू

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील आडस-केकानवाडी परिसरामध्ये अवकाळी पाऊस झाला. या अवकाळी पावसात वीज कोसळून शेतकऱ्यासह गायीचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. देवीदास शहाजी केकाण वय ६५ वर्षे रा. केकाणवाडी असे



वीज कोसळून मयत झालेल्या शेतकऱ्याचे नाव असून, ते दुपारी आसरडोह रस्त्याकडील नवरुका शिवारात जनावरे चारीत होते. यावेळी अचानक पाऊस आल्याने ते लिंबाच्या झाडाखाली उभे होते. यावेळी या झाडावर वीज कोसळून शेतकरी देवीदास केकाण जागीच ठार झाले तर एक गाय ही दगावली आहे. वेधशाळेने गारपीट व वादळीवाऱ्यासह अवकाळी पावसाचा अंदाज वर्तविला होता. या अंदाजा प्रमाणे दिनांक ३ एप्रिल २०२५ रोजी दुपारी ३:३० वाजण्याच्या सुमारास केज तालुक्यातील आडस परिसरात सुसाट्याच्या वाऱ्यासह अवकाळी पाऊस झाला. या घटनेची माहिती तालुका प्रशासन आणि आडस पोलीस चौकीला देण्यात आली आहे.



कै.ब्रम्हीभुत गुरूवर्य साहेबराव ढेकळे गो पालन सेवाभावी संस्था तिप्पटवाडी सादक आश्रमच्या वतीने तिप्पटवाडी ते श्रीक्षेत्र पैठण पायी दिंडींचे आयोजन करण्यात आले आह

# अंजली द़मानिया, जरांगे आणि धनंजय देशमुख पहिल्यादाच एकत्र भेटले, अर्धा तास खलबत



बीड जिल्ह्याच्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांचं अपहरण करून हत्या करण्यात आली. हे प्रकरण सध्या राज्यभर गाजत असून, वातावरण चांगलंच तापलं आहे. या प्रकरणात सुरुवातीपासून ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया आणि मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. दरम्यान आज अंजली दमानिया या जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना त्यांनी मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली, यावेळी तिथे संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख देखील उपस्थित होते. तिघेही एकत्र भेटण्याची ही पहिलीच वेळ आहे, तिघांमध्ये जवळपास अर्धा तास चर्चा झाली. आपण मनोज जरांगे पाटील यांच्या तब्येतीची विचारपूस करण्यासाठी अंतरवाली सराटीमध्ये आल्याचं दमानिया यांनी यावेळी म्हटलं. नेमकं काय म्हणाल्या दमानिया? गेल्या दोन महिन्यांमध्ये जालन्याचे शेतकरी मला दोनदा येऊन भेटून गेले होते. त्यांना मी अश्वासन दिलं होतं की मी तिथे येते. काय सत्य परिस्थिती आहे त्याची पाहाणी करते. आणि तुमच्याकडून माहिती घेते, कारण मुंबईपर्यंत सर्वांनाच पोहोचता येत नाही. म्हणून मी इथे येण्याचं ठरवलं होतं आणि जालन्यात आले म्हणून मी दादांची देखील भेट घेतली, त्यांच्या तब्येतीची विचारपूस केली, असं अंजली दमानिया यांनी यावेळी म्हटलं आहे. जरांगे पाटील यांची प्रतिक्रिया संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणात सुरुवातीपासूनच मनोज जरांगे पाटील यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर आरोपीला पकडण्याच्या मागणीसाठी जे आक्रोश मोर्चे निघाले त्या प्रत्येक मोर्चाला मनोज जरांगे पाटील उपस्थित होते. दरम्यान आजच्या या भेटीनंतर प्रतिक्रिया देताना त्यांनी मोठी मागणी केली आहे. संतोष देशमुख प्रकरणात माजी मंत्री धनंजय मुंडे यांना मुख्य आरोपी करा अशी मागणी मनोज जरांगे पाटील यांनी केली आहे. धनंजय मुंडे यांना मुख्य आरोपी करायल हवे. कारण तेच कर्तेकर्वीते आहेत, असा आरोप यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार ४ एप्रिल २०२५
https://lokaarambh.com



## सं पा द की य

## बांगलादेशातील उद्रेक अजुन संपलेला नाही

बांगलादेशाचे हंगामी प्रमुख डॉ.महंमद युनूस यांनी भारताच्या ईशान्येकडील राज्यांचा केलेला उल्लेख अनाठायी आणि अपरिपक्व असाच आहे. भारताच्या ईशान्येकडील सातही राज्ये भूवेष्टित असून, किनारपट्टीसाठी जाण्याचा मार्ग त्यांच्याकडे नसल्याचे त्यांनी नमूद केले. ही त्यांची उठाठेव अस्थानी असली, तरी त्यात एक प्रकारे भारताला इशाराही आहे. ईशान्येकडील राज्यांना भलेही समुद्रकिनारा नसला, तरी ते भारताचे घटक आहेत आणि या देशाला साडेसात हजार किमीपेक्षा अधिक लांबीची किनारपट्टी असून, ती बांगलादेशाच्या किनारपट्टीहून तब्बल दहापटीने अधिक आहे. हे वास्तव असले, तरी ङ्कसप्तभगिनीफ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या, ईशान्येकडील राज्यांची कोंडी करता येऊ शकते, असा इशारा युनूस यांच्या वक्तव्यातून निघतो. पश्चिम बंगालमधील सिलिगुडीचा भाग ईशान्येला उर्वरित देशाशी जोडतो. ङ्कचिकन नेकफ म्हणून ओळखला जाणारा हा भाग नेपाळ, भूतान आणि बांगलादेश यांनाही जोडणारा आहे. या ङ्कचिकन नेकफ्ला म्हणूनच मोठे महत्त्व आहे. ईशान्येकडील राज्यांचे उर्वरित देशाशी असलेले दळणवळण अधिक वेगाने होण्यासाठी तेथील रेल्वे व रस्ते यांचे जाळे विस्तृत करण्यासाठीची आणि त्याचबरोबर अन्य पूरक पायाभूत सुविधा आणखी वाढविण्याची गरज युनूस यांच्या या वक्तव्याने प्रकर्षाने समोर आली आहे. चिनी उद्योगांनी बांगलादेशात यावे, यासाठीचे आवाहन करताना युनूस यांनी केलेल्या भारताच्या अंतर्गत भूगोलाच्या उल्लेखाकडे म्हणूनच सावधानतेने पाहण्याची गरज आहे. गेल्या ऑगस्टमधील विद्यार्थ्यांच्या हिंसक उठावानंतर बांगलादेशात शेख हसीना सत्ताभ्रष्ट झाल्या असल्या आणि तिथे युनूस यांच्या नेतृत्वाखाली हंगामी सरकार असले, तरी त्या देशातील उद्रेक अद्याप शमलेला नाही. तेथील अल्पसंख्याक हिंदू समाजाच्या विरोधातील हिंसाचार पुरता थांबलेला नाही. अर्थतज्ज्ञ म्हणून डॉ.युनूस यांची प्रतिमा चांगली आहे आणि बांगलादेशात त्यांनी तळागाळात कामही केलेले आहे; परंतु देशाचा प्रमुख म्हणून काम करण्याचा त्यांना अनुभव नव्हता. देशप्रमुखाची भूमिका बजावताना, देशात कायदा आणि सुव्यवस्था निर्माण करण्यात त्यांना पूर्णपणे यश आलेले नाही. बांगलादेशाची विस्कटलेली आर्थिक घडी पुन्हा बसविण्यातही त्यांना कसरत करावी लागत आहे. आर्थिक विकासाबाबत बांगलादेशाची घोडदौड काही वर्षांपूर्वी सुरू होती. आता या दराची वेगाने घसरण होत असून, तो चार टक्क्यांपर्यंत खाली आला आहे. परिणामी बेरोजगारी वाढते आहे आणि महागाईचा दरही गगनाला भिडतो आहे. युनूस यांच्या चीन दौऱ्याला ही पार्श्वभूमी आहे. चीनकडू न सहा अब्ज डॉलर कर्ज घेतलेल्या बांगलादेशाला आणखी मदतीची अपेक्षा आहे. चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांच्याशी झालेल्या चर्चेनंतर दोन्ही देशांत नऊ करार झाले. त्यानंतर गुंतवणूकदारांशी बोलताना युनूस यांनी जिनपिंग यांना आमंत्रण दिले. चीनकडून वाढीव मदत मिळण्यासाठी काय वाट्टेल ते करू, अशी हमीच जणू त्यांनी या वेळी दिली. यातून त्यांची हतबलता दिसत असली, तरी बांगलादेशाच्या नव्या धोरणाचे सूचनही होते. बांगलादेश आता चीन आणि पाकिस्तान यांच्याकडे अधिक झुकतो आहे. भारताशी असलेल्या संबंधांतील माधुर्य जवळ जवळ संपले आहे. बांगलादेशाच्या स्वातंत्र्यदिनी युनूस यांना पत्र लिहून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संबंधांमध्ये काही सुधारणा आणण्याचा प्रयत्न केला खरा; परंतु बांगलादेशाकडू न त्याबाबत अद्याप सकारात्मक प्रतिसाद मिळालेला नाही. उलट चीन दौऱ्यातील युनूस यांच्या वक्तव्याने कटुता वाढण्याचीच शक्यता आहे. आपल्या भूमिकेवर ठाम राहतानाच बांगलादेश चीनच्या आहारी जाणार नाही, यासाठी पावले उचलण्याची भारताला गरज आहे. याच आठवड्यात थायलंडमधील बँकॉक येथे ङ्कबिम्सटेकफदेशांची परिषद होत आहे. भारत आणि बांगलादेशासह नेपाळ, भूतान, म्यानमार, थायलंड आणि श्रीलंका यांचा सहभाग असलेली ही संघटना परस्परांमधील विविध क्षेत्रांतील सहकार्य वाढविण्यासाठी प्रयत्नशील आहे. या व्यासपीठावर भारत आणि बांगलादेश परस्परांशी कसा संवाद साधतात हे महत्त्वाचे ठरेल. पंतप्रधान मोदी या परिषदेसाठी थायलंडला जाणार आहेत. युनूस हेही तिथे जातील. दोन्ही नेत्यांची भेट होईल का, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. युनूस हे लोकनियुक्त नेते नसल्याने मोदी त्यांना भेटण्याची शक्यता कमी असल्याचे सांगितले जात आहे.

## लोकशाहीचा चौथा स्तंभ पत्रकारीता त्याच्या माध्यमातून जनसेवा करणारे : संपादक बालासाहेब फड

भारतीय लोकशाही ही जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून गणली जाते.विविधतेने नटलेल्या या देशाला एका सूतात बांधण्याचे काम भारतीय संविधानाने केले आहे.त्या संविधानाने भारतीय लोकशाहीचे प्रमुख चार स्तंभ सांगितले असून त्यातील एक कायदे मंडळ,दोन कार्यकारी मंडळ तर तीन न्यायमंडळ व चौथा स्तंभ हा प्रसार माध्यमांचा आहे.या प्रसार माध्यमात पत्रकारीता हे महत्वाचे प्रसार माध्यम आहे.अलीकडे माणसे प्रत्येक बाबतीत संकुचित विचार करत आहेत अस्या काळात पत्रकारीता करणे हे सतीचे वाण आहे.ते स्विकारून प्रामाणिकपणे काम करणा-या संपादकांपैकी महत्वपूर्ण संपादक म्हणजे बालासाहेब फड होत.

आज दि.०४ एप्रिल २०२५ हा त्यांचा जन्मदिवस.त्यानिमित्ताने त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा घेतलेला हा आढावा.

भारत हा विविधतेने नटलेला देश आहे.या देशाला फार प्राचीन परंपरा लाभलेली आहे.हा देश एकेकाळी सोने की चिडिया म्हणून ओळखला जात होता. येथे नालंदा,तक्षशिला सारखे विद्यापीठे होती. ङ्कराजा स्वदेश पूजन्ते श्र विद्वान सर्वत्र पुजन्तेङ्क असा विचार प्रामुख्याने मांडला जात होता.नंतर या देशावर परकीयांनी आक्रमणे केली व या देशाला लुटले.त्यातच राजेशाहीचा जन्म झाला.छत्रपती शिवरायां सारखे मोजके राजे सोडले तर अनेक राजांनी जनतेची पिळवणूक केली.नंतर देशावर दीडशे वर्षे इंग्रजांनी राज्य केले.त्यांनी भारतीय जनतेचा अनन्वित छळ केला.अशातही काही सुधारणा ही आणल्या. तदनंतरच्या कार्यकाळात १५ ऑगस्ट १९४७ ला देशाला स्वातंत्र्य मिळाले पण लोकांची खरी प्रगती करावयाची असेल तर लोकशाही शिवाय पर्याय नाही हे लक्षात घेऊन येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर व अन्य विद्वानांनी संसदीय लोकशाहीचा स्वीकार केला.तीला बळकट बनविण्याचे काम हे प्रसारमाध्यमे करताहेत.

बालासाहेब फड यांचा जन्म ०४ एप्रील १९७४ रोजी माता गंगाबाई व पिता सिताराम यांच्या पोटी बारा ज्योतिर्लिंगापैकी एक असलेल्या वैद्यनाथाच्या शेजारी असलेल्या कन्हेरवाडी ता.परळी येथे झाला. त्यांना बालपणापासुन प्रभू वैद्यनाथ व संत जगमित्र नागा यांचा आशीर्वाद लाभला.घरात सात पिढ्यांपासून वारकरी संप्रदायाचे वातावरण असल्यामुळे कीर्तन,नामस्मरण व श्रवणभक्ती घडली व या अनुषंगाने चौफेर ज्ञान प्राप्त करता आले.ते स्वतः वारकरी संप्रदायाचे अनुयायी आहेत. सांप्रदायावर त्यांचा जीव आहे.त्यांनी आपल्या ह.भ.प. बालकिर्तनकार प्रकाश महाराज फड नावाच्या मुलाला वयाच्या सातव्या वर्षी ज्ञानाई गुरुकुल सेलू येथे वारकरी संप्रदायाचे शिक्षण घेण्यासाठी ठेवले. त्यांचे चिरंजीव या वयात अभ्यासू व उत्तम कीर्तन करतात. तसेच त्यांचे दुसरे चिरंजीव ह.भ.प बाल कीर्तनकार संग्राम महाराज फड हे ही कीर्तनकार म्हणून प्रसिद्ध आहेत. या पुर्वी म्हटल्या प्रमाणे वृत्तपत्र व्यवसाय हा सतीचे वाण आहे .कारण या व्यवसायात बातमी लावताना हजारदा विचार करावा लागतो.बातमीची सत्यता असावी, स्पष्टता असावी,सदरक्षणाय खलनिग्रहणाय हे साध्य व्हावे. पद,पैसा,तोंड पाहून न लिहिता जे सत्य आहे ते लिहावे लागते. ही सगळी वैशिष्ट्ये संपादकाला पाळावी लागतात.एखादी चुकीची बातमी लागली तर त्याची खूप मोठी किंमत संपादकाला सोसावी लागते हे एक प्रकारचे अग्निदिव्यच आहे. पण हे अग्निदिव्य संपादक बालासाहेब फड हे १९९५ पासून सांभाळत आहेत.त्यांनी साप्ताहिक परळी संदेश या पासून ते हे काम करत आहेत.ना कुठला या क्षेत्रातला वारसा ना भरगच्च पाठीमागे संपत्ती पण प्रामाणिकतेच्या जोरावर हे कार्य ते पार पाडताना दिसतात.संत तुकाराम महाराजांनी म्हटल्याप्रमाणे





असाध्य ते साध्य करिता सायास

या न्यायाप्रमाणे त्यांनी ही असाध्य काम साध्य केले आहे.या साप्ताहिकाचे काम करत करत २०१६ पासून सोमेश्वर साथी या दैनिकाचा प्रारंभ केला आहे.या दैनिकाच्या माध्यमातून त्यांनी अनेक नवोदितांना लेखन मंच उपलब्ध करून दिला आहे. आमचे अनेक लेख त्यांनी छापून आम्हाला लिहिते करण्याचे काम ते करतात.एवढेच नाही तर समाजात चांगुलपणा पेरण्याचं काम करणाऱ्या गुणवंतांचा या वृत्तपत्राच्या मार्फत पुरस्कार देऊन सन्मानही करतात.चांगल्या कार्याला प्रबलन देण्याचं काम ते सतत करत आले आहेत.यासाठी स्वतःचे मन मोठे असावे लागते. जगाला ज्यांच्या कार्य कर्तुत्वाचा अभिमान वाटतो त्या शिवरायांच्या जन्मोत्सवाच्या निमित्ताने हा कार्यक्रम घडवून आणतात. त्याशिवाय अशा गोष्टी करता येत नाहीत.हेच यातून दिसून येते.

भले तरी देऊ कासेची लंगोटी श्र
नाठाळाचे माथी हाणू काठी श्र

ही भूमिका त्यांची दिसते.वारकरी संप्रदायाची प्रत्येक घडामोड आवर्जून आपल्या वृत्तपत्रात घेतात.

त्यांच्या अंतकरणात आपणास मदत करणा-यांबद्दल सतत कृतज्ञता दिसते.

आय.ए.एस.मा.किरण गित्ते साहेब व विवेकानंद यूथ वेलफेअर सोसायटीच्या अध्यक्षा मा.सौ. उषाताई किरण गित्ते त्यांच्याप्रती ते नेहमी आभार व्यक्त करतात.वारकरी संप्रदायातील अनेक गायक,वादक,कीर्तनकार हे त्यांचे अत्यंत जवळचे मित्र आहेत. त्यांना आई-वडिलांचे आई गंगाबाई वडील सितारामजी यांचे सुरुवातीपासून सहकार्य लाभले. दोन भाऊ तसे दोन मुलांचे ही सहकार्य लाभत आले आहे. संपादक म्हटले की समाजसेवेसाठी खूप वेळ द्यावा लागतो अशा वेळेस घर सांभाळणारी व समजून घेणारी पत्नी महत्त्वाचे असते २००२ साली लग्न झाले तेव्हापासून मुलांची व परिवाराची सर्वाधिक काळजी त्यांच्या सौभाग्यवती ज्ञानेश्वरी बालासाहेब फड या घेत आहेत. त्यांच्या बद्दलही ते भरभरून सांगतात. वारकरी संप्रदायातील अनेक महाराज मंडळी वरती लेख ते नेहमीच आपल्या वृत्तपत्रात छापतात. महापुरुषांच्या व कार्यकर्तृत्व गाजवणाऱ्या राजकीय नेत्यांच्या वरती ही ते नेहमीच आपल्या वृत्तपत्रातून भरभरून लिहताना दिसतात.

त्यांच्या कार्याची दखल घेवुन त्यांची महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या परळी तालुकाध्यक्ष पदी निवड झाली.त्यांना आतापर्यंत अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.

अस्या सव्यासाची व पत्रकारीतेसी प्रामाणीक असणा-या संपादक मा.बालासाहेब फड यांचा आज वाढदिवस.त्यानिमित्त त्यांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा देतो व त्यांच्याकडून भविष्यातही असेच वृत्तपत्रीय व अन्य कार्य घडेल अशी अपेक्षा व्यक्त करून मी माझे लेखन थांबवतो.

प्रा.डॉ.रामकृष्ण बदने
ग्रामीण महाविद्यालय,वसंतनगर
ता.मुखेड जि.नांदेड
भ्रमणध्वनी -९४२३४३७२१५

## नागापूर खुर्द शाळेतील सातवीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ कार्यक्रम संपन्न

बीड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नागापूर खुर्द येथे इयत्ता सातवीच्या निरोप समारंभाचा कार्यक्रम इयत्ता सहावी ने आयोजित केला होता. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका सुमन जोगदंड या होत्या. तर प्रमुख पाहुणे म्हणून अशोक नगर बीट चे ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी सिद्धेश्वर माटे तसेच खांडे पारगाव केंद्राचे केंद्रीय मुख्याध्यापक तथा केंद्रप्रमुख जलील शेख नागापूर खुर्द चे सरपंच सुमेधा साळुंके व उमरद खालसा शाळेचे मुख्याध्यापक संतोष जोशी नागापूर बुद्रुकचे मुख्याध्यापक युवराज साळुंके खांडे पारगाव केंद्राचे समन्वयक बिबीशन शिरसागर शालेय व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष मा धर्मराज साळुंके आदी मान्यवर उपस्थित होते.



कार्यक्रमाच्या सुरुवातीला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर शाळेचे विद्यार्थी धनश्री साळुंके ,मानसी किवणे व आराध्या साळुंके यांनी स्वागत गीत सादर केले. त्यानंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे शिक्षक अजित मुळूक यांनी केले. त्यानंतर इयत्ता सातवीच्या विद्यार्थिनींनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यानंतर इयत्ता सातवीच्या वतीने शाळेसाठी पृथ्वीगोल व जगाचे नकाशे हे शाळेला भेट स्वरूपात देण्यात आले. त्यानंतर मान्यवरांचे भाषणे झाली. व शाळेच्या वतीने ही सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे शिक्षक सुमन जोगदंड सुधीर कदम अयोध्या आंधळे अलका गेठे प्रतिमा छत्रबंद प्रज्ञा उजगरे अजित मुळूक आदींनी परिश्रम घेतले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गौरी गुरव व आराध्या साळुंके यांनी केले. तर आभार प्रदर्शन मानसी किवने हिने केले .

## मंगलसांगवी येथील जलजीवन मिशनचे काम नित्कृष्ट दर्जाचे होत असल्याबाबत ग्रामस्थांची सीईओकडे निवेदनाद्वारे तक्रार

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट
नांदेड : कंधार तालुक्यातील मंगलसांगवी येथे जलजीवन मिशन अंतर्गत व ग्रामपंचायतच्या कामात भ्रष्ठाचार व अनियमितता करत पाणी पुरवठ्याचे काम चालु असलेल्या कामाची चौकशी करुन कंत्राटदार राघवेंद्र कंन्ट्रक्शन देगलूर यांच्यावर फौजदारी पोलीस कार्यवाही करुन परवाना काळ्या यादीत टाकन्यात यावा याबाबतचे निवेदन मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद व कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणीपुरवठा विभाग नांदेड यांना हरीश कदम,सचिन कदम,नागेश कदम व ग्रामस्थांच्या वतीने देण्यात आले. सन २०२२ मध्ये राज्य व केंद्र शासनाच्या संयुक्त ५०/५० टक्के रक्कमेसह ग्रामपंचायत मंगलसांगवी येथे १,४८,१५००/- जलजीवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठा करण्याचे काम कंत्राटदार राघवेंद्र कंन्ट्रक्शन देगलूर यांना देण्यात आले होते. सदर काम १८ महिन्यात करावयाचे होते. मंगलसांगवी ग्रामपंचायत अंतर्गत काम चालु झाल्यापासून ते आजपर्यंत काम पुर्ण झाले नाही. दरम्यानच्या कालावधी मध्ये सदर कामाचे गावातील जागृत नागरीकांनी निकृष्ठ व अंदाज पत्रकाप्रमाणे होत नसल्याची तक्रार दाखल केल्यावरुन सदर काम दीड वर्ष बंद ठेवण्यात आले होते. परंतू सदर बंद असलेले काम सध्या सुरु करण्यात आले असून घरघर नळ जोडणीचे काम चालू असून मुख्य पाईपलाईन फक्त दीड फुट अंतर खोल नालीत टाकण्यात येत असून सदर पाईप हे निकृष्ठ दर्जाचे व नेमूण दिलेले नसल्याने टाकेलेली पाईप लाईन ही काही महिन्यातच फुटून परत पाण्याची समस्या निर्माण होणार आहे. या बाबीकडे नेमून दिलेले अभियंता यांच्याशी कंत्राटदाराने संगनमत करुन काम चालू असल्याचे दिसून येत आहे. मंगलसांगवी ग्रामपंचायत अंतर्गत चालू असलेले जलजीवन मिशन पाणी पुरवठ्याच्या कामावर समक्ष भेट देवून कामाची पहाणी करुन कंत्राटदार राघवेंद्र कंन्ट्रक्शन देगलूर यांच्यावर फौजदारी पोलीस कार्यवाही करुन सदर परवाना काळ्या यादीत टाकण्यात यावा अन्यथा ग्रामवासीयांच्या वतीने तीव्र अंदोलन छेडण्याचा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.निवेदनावर हरीश कदम,सचिन कदम,नागेश कदम यांच्या साक्षऱ्या आहेत.

## ग्रामीण भागातील सर्वसामान्य माणसाला वाचनात आवड निर्माण करुनही स्वानंद सार्वजनिक वाचनालय, आनंदगांव उपेक्षित का?

(विशेष:-अशोक नागरगोजे, संपादक , साप्ताहिक बीड युवामत)स्वानंद सार्वजनिक वाचनालय या संस्थेची स्थापना जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक, सुप्रसिध्द वक्ते व व्याख्याते वसुदेव (बप्पा) गायकवाड यांनी दूरदृष्टी ठेवून ग्रामीण भागात वाचक संख्या वाढवुन वाचकांच्या मनात वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी श्री .वसुदेव बप्पा गायकवाड अध्यक्षतेखाली व मार्गदर्शना खाली १ एप्रिल १९९७ रोजी मुहूर्तमेढ रोवली गेली. सलग २८ वर्षे ग्रंथालय अखंड सेवा देत आहे. सर्व शेतकऱ्यांना व सर्व वाचकांना सेवा देत आले, या मध्ये आमदार फंडातून २००४, २००५ मध्ये ७०० चौरस फुट “ वाचनालय खोली “ बांधकाम झाले पण अद्यापही इमारतीचे ग्रामपंचायतने हस्तांतरण करून सदरील “ वाचनालय खोली “ इमारत हस्तांतर करून वाचनालयाच्या ताब्यात दिलेली नाही. हे महाराष्ट्राच्या इतिहासातील उदाहरण ठरले आहे.” वाचनालय खोली” आमदार फंडातून बांधूनही वाचनालयाच्या ताब्यात नाही हे दुर्दैवच म्हणावे लागेल. ग्रामपंचायतच्या इच्छा शक्तीचा अभाव म्हणावे



लागेल. मुले मुली, महिला पुरुष, जेष्ठ नागरिक, विद्यार्थी विद्यार्थिनी, शेतकरी, कष्टकरी यांचासाठी मोठ्या प्रमाणात वाचन साहित्य उपलब्ध आहे, वाचकांचा प्रतिसादही उत्तम आहे. ग्रंथालयामार्फत विविध सांस्कृतिक कार्यक्रम राबवून वाचकांना प्रोत्साहन दिले जाते. आजही वाचनालय ग्रामपंचायतच्या खुप जुण्या, गळक्या इमारतीत आहे, दरवर्षी शेकडो ग्रंथ भिजून खराब होतात हे वास्तव आहे.आसे होत असताना ऊघडपणे बघत राहणे कितपत योग्य आहे, आज वाचनासाठी उपलब्ध असलेले ग्रंथ, साहित्य भिजत आस्तील त्याकडे लक्ष देणे आपले कर्तव्य नाही का? आज समाजात ग्रंथ साहित्य वाचण्याची गरज आहे आपण सर्वांनी प्रोत्साहन देण्याची गरज असल्याचे वाटते

------

संस्था परिचय

----

स्वानंद सार्वजनिक वाचनालय,
आनंदगांव ता. केज. जि. बीड
या संस्थेची स्थापना १ एप्रिल १९९७ या वर्षी झाली.
संस्थापक अध्यक्षः- वसुदेव (बप्पा) गायकवाड
कालावधीः- २८ वर्षे पूर्ण
दर्जा / वर्ग:- इतर “ ब “
ग्रंथ संख्याः- १९७३५
नियतकालिके:- ५६
दैनिके----१६
वार्षीक वाचक सभासदः - 325
जागा:- ७०० चौरस. फुट
सांस्कृतीक कार्यक्रम:- ५०.

## 12 एप्रिलपासून नांदेड मध्यवर्ती बसस्थानक कौठा ग्राउंडवर होणार स्थलांतरित

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट
नांदेड - नांदेड रेल्वे स्टेशन ते मध्यवर्ती बस स्थानक दरम्यानच्या रस्त्याच्या मजबुतीकरणासाठी नांदेड मध्यवर्ती बस स्थानकाचे तात्पुरत्या स्वरूपात कौठा भागातील मामा चौक कौठा मोदी ग्राउंड येथे १२ एप्रिलपासून स्थलांतर करण्यात येणार आहे. नांदेड बस स्थानकाच्या या तात्पुरत्या स्थलांतरणांमुळे नांदेड बस स्थानकावर येणाऱ्या जाणाऱ्या बस फेऱ्यांच्या वाहतूक मार्गात, किलोमीटरमध्ये तसेच टप्प्यामध्येही बदल करण्यात येणार असल्याचे राज्य परिवहन विभागाच्या नांदेड विभाग नियंत्रकांनी स्पष्ट केले आहे. नांदेड मध्यवर्ती बसस्थानक स्थलांतरित करण्यासंदर्भात नोव्हेंबर, डिसेंबर २०२४ पासूनच हालचाली सुरू झाल्या होत्या. मात्र जागेअभावी हे स्थलांतर रखडले होते. नांदेड शहरातील अबचलनगर येथे तात्पुरत्या स्वरूपात बसस्थानकाचे स्थलांतर करण्याबाबत निर्णय घेण्यात आला होता; मात्र त्याला स्थानिकांनी विरोध केल्यानंतर एक विशेष समिती गठित करून बस स्थानकाच्या तात्पुरत्या स्थलांतरणासाठी पर्यायी जागांचा शोध सुरू होता. तो शोध अखेर पूर्ण झाला आहे आणि आता नांदेड मध्यवर्ती बसस्थानक नवीन कौठा भागातील मोदी ग्राउंडवर स्थलांतरित केले जाणार, हे स्पष्ट झाले आहे. बसस्थानक ते रेल्वे स्टेशन या अंतरातील रस्त्याचे काम करण्यासाठी नांदेड मध्यवर्ती बसस्थानक तात्पुरत्या स्वरूपात स्थलांतरणाबाबत नांदेड जिल्हाधिकारी २९ नोव्हेंबर २०२४ आणि २२ जानेवारी २०२५ रोजी बैठका घेतल्या होत्या. याबाबतीत राज्य परिवहन महामंडळास



आणि शासनाच्या संबंधित विभागास बसस्थानक तात्पुरत्या स्वरूपात स्थलांतरित करण्याबाबत सूचना दिल्या होत्या. या स्थलांतरणासंदर्भात जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी १२ मार्च २०२५ रोजी मध्यवर्ती बस स्थानकात प्रत्यक्ष भेट देऊन तेथील परिस्थितीचा आढावा घेतला. त्याचवेळी नांदेड मध्यवर्ती बसस्थानक १२ एप्रिल २०२५ पासून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कौठा ग्राउंड अर्थात मोदी ग्राउंड या ठिकाणी बस स्थानक तात्पुरत्या स्वरूपात स्थलांतरित करण्याबाबत आदेश दिले आहेत. या तात्पुरत्या स्थलांतरणांमुळे राज्य परिवहन विभागाच्या नांदेड आगाराच्या बसना इंधन भरणे व दैनंदिन वाहन देखभालीसाठी होळकर चौक, खडकपुरा मध्यवर्ती कारागृहाच्या बाजूने आत येण्यासाठी आणि डॉक्टर लेनच्या पहिल्या गल्लीतून बाहेर जाण्याबाबत परवानगी देण्यात आली आहे. त्यामुळे नांदेड बस स्थानक ते नवीन कौठा बस स्थानक या मार्गावर कोणतीही प्रवासी वाहतूक करू नये, असेही आदेशित करण्यात आले आहे. नवीन बस स्थानक मामा चौक कौठा, नांदेड येथे प्रवाशी निवारा, वाहतूक नियंत्रण कक्ष, आरक्षण कक्ष, हिरकणी कक्ष, प्रवाशांसाठी शौचालय, स्नानगृह, मुक्कामी बसच्या चालक वाहकांसाठी विश्रांतीगृह, शौचालय व स्नानगृह आदी आवश्यक बाबींची जिल्हा प्रशासनाकडून उपलब्धता करून देण्यात येणार आहे.

## शेख सुलतान यांनी शुन्यातून येत तिन्ही मुलांना केले उच्च शिक्षीतमुहम्मदी फार्मसी ऑफिसर, जाफर एम्ब्रीयोलॉजिस्ट, इरम ट्रान्स प्लांट नर्स



बीड (प्रतिनिधी) - मूळचे अहमदनगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यात असलेल्या चिचोंडी शिराळ येथील रहिवासी, बीड शहराचे जावई आणि गेल्या ३२ वर्षांपासून औरंगाबाद येथे स्थायिक झालेले शेख सुलतान याकूब यांनी अक्षरशः शून्यातून पुढे येत आपल्या तिन्ही मुलांना उच्चशिक्षित केले. यात मोठी मुलगी शेख मुहम्मदी सुलतान (नागपूर) हिने एम. फार्म पर्यंत विशेष प्राविण्याने शिक्षण घेत फार्मसी ऑफिसर पदापर्यंत झेप घेतली. (तिचे इयत्ता पहिली ते चौथी पर्यंतचे शिक्षण बीड शहरातील छत्रपती शाहू महाराज प्राथमिक विद्यालयात आजोळी झाले). मुलगा शेख ज़ाफ़र सुलतान (गोंदिया) हा एम.एस.सी.सी.इ. पर्यंत शिक्षण घेऊन एम्ब्रीयोलॉजिस्ट (भ्रूण शास्त्रज्ञ) झाला तर लहान मुलगी शेख इरम सुलतान (पुणे) हि पी.बी.एस.सी. पर्यंत चे शिक्षण घेऊन ट्रान्स प्लांट नर्स झाली आहे. या तिघांनीही मेहनत आणि चिकाटी च्या बळावर गरुड झेप घेऊन आई-वडिलांनी त्यांच्यासाठी घेतलेल्या श्रमाचे चीज केले आहे. रमज़ान ईद निमित्ताने हे तिन्ही बहीण-भाऊ औरंगाबाद येथील घरी आले असता त्यांचे पीर ओ मुर्शिद हज़रत सय्यद रौशन मियाँ (हैदराबाद) यांच्या प्रमुख उपस्थितीत व हस्ते तिघांचेही अभिनंदन करून सत्कार करण्यात आले. तसेच यापुढेही त्यांनी अनेक यशस्वी शिखरे लिलया पादाक्रांत करावी अशा शुभेच्छा देण्यात आल्या. या तिन्ही भावंडांनी दाखवून दिले की, पालक जागरूक असले आणि जिद्द, चिकाटी व मेहनतीच्या बळावर शिक्षणाची कास घट्ट धरली तर परिस्थिती कशीही असो आपल्याला हवे ते साध्य करता येते. यावेळी मुलामुलींचे मामू मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़-शेख कौसर जहाँ (मामू-मुमानी), नईम अहेमद (मामू), शेख फुरखान, शेख वासेख, शेख लईख, मुहम्मद अली यांची उपस्थिती होती.

आपला
एस.एम.युसूफ़ (मुक्तपत्रकार)
आसेफ़नगर, बीड

# व्हाईस ऑफ मीडियाची केज तालुका कार्यकारिणी जाहीर

## तालुकाध्यक्षपदी रामदास साबळे, कार्याध्यक्षपदी डॉ.हनुमंत सौदागर

केज (प्रतिनिधी) दि.३ : व्हाईस ऑफ मीडियाच्या केज तालुकाध्यक्षपदी पत्रकार रामदास साबळे तर कार्याध्यक्षपदी पत्रकार डॉ.हनुमंत सौदागर यांची गुरुवारी (दि.३) बिनविरोध निवड करण्यात आली आहे. व्हाईस ऑफ मीडियाच्या तालुका कार्यकारिणीच्या नूतन पदाधिकारी निवडीची बैठक ज्येष्ठ पत्रकार मधुकर सिरसाट यांच्या अध्यक्षतेखाली केज येथील व्हाईस ऑफ मीडियाच्या कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत व्हाईस ऑफ मीडियाच्या



नूतन पदाधिकाऱ्यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. या बैठकीस व्हाईस ऑफ मीडियाचे सचिव दीपक नाईकवाडे, कोषाध्यक्ष संतोष गालफाडे, प्रसिद्धी प्रमुख दिनकर राऊत, संघटक मनोराम पवार, किशोर पत्रावळे आदींसह संघटनेचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. यावेळी नूतन तालुकाध्यक्ष, कार्याध्यक्ष यांचा सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. व्हाईस ऑफ मीडियाच्या नूतन पदाधिकाऱ्यांच्या निवडीचे सर्वस्तरातून स्वागत होत आहे.

# सार्वजनिक बांधकाम विभागातील शेख शफीभाऊ यांचा लिंबागणेश ग्रामपंचायत मार्फत सेवानिवृत्ती निमित्त सत्कार समारंभ

लिंबागणेशः- ( दि.०३) बीड तालुक्यातील लिंबागणेशचे भुमिपुत्र शेख शफीभाऊ शेख अब्दुल हे नियत वयोमानानुसार पाटोदा सार्वजनिक बांधकाम विभाग येथुन निवृत्त झाले असुन आज दि.०३ गुरुवार रोजी ग्रामपंचायत कार्यालयात ग्रामपंचायतीच्या वतीने शाल , श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन हृद्य सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच बालासाहेब जाधव होते.कार्यक्रमाची प्रस्तावना व सुत्रसंचलन भिम टायगर ग्रुप जिल्हाध्यक्ष रविंद्र निमर्ळ यांनी केले. शेख शफीभाऊ यांचे वर्गमित्र निवृत्त अभियंता गणपत तागड यांनी तसेच पत्रकार हरीओम क्षीरसागर,माजी सरपंच बाळासाहेब मुळे, ग्रामपंचायत सदस्य शेख सम ीर, रमेश गायकवाड यांनी आपले मनोगत व्यक्त केले. डॉ.गणेश ढवळे यांनी शेख शफीभाऊ यांनी केलेल्या सेवेचा व त्यांच्या कार्याचा गुणगौरव करीत असताना त्यांच्या सेवानिवृत्ती नंतरचा काळ सुखी, समृद्धी, आनंदाने जावो व त्यांना निरोगी दीर्घायुष्य लाभो यासाठी शुभेच्छा दिल्या. सत्कारमूर्ती शेख शफीभाऊ यांनी सत्काराला उत्तर देताना सार्वजनिक बांधकाम विभाग नांदेड जिल्ह्यातील धर्माबाद तालुक्यातील भोकरदन सार्वजनिक बांधकाम उपविभाग याठिकाणी २६ वर्षे सेवा केल्यानंतर १५ वर्षे बीड जिल्ह्यातील पाटोदा याठिकाणी ३१ मार्च रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्ती झाल्याचे सांगताना



शासकीय नोकरी करत असताना गावच्या मातीची ओढ , त्यांना आलेले अनुभव कथन केले. ग्रामपंचायत मार्फत करण्यात आलेल्या सत्कार समारंभाबद्दल सरपंच आणि ग्रामपंचायत सदस्यांचे आभार मानले. यावेळी शुभेच्छा देण्यासाठी माजी सरपंच राजेभाऊ गिरे, संदिप मंडलिक, बाळकृष्ण थोरात,ग्रामपंचायत सदस्य श्रीहरी निमर्ळ , दामोदर थोरात, महादेव कुदळे, अशोक जाधव, अँड . गणेश वाणी,संतोष भोसले, अशोक वाणी,दादा गायकवाड, शेख खाजु,सय्यद रफिक,शेख अकबर मिस्त्री, आरूण ढवळे, राजेंद्र ढास ,अमोल जाधव ,राजेभाऊ आगवान आदि ग्रामस्थांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

# पालकमंत्र्यांचा जनता दरबार; नागरिकांचा प्रतिसाद बीड शहरातील नागरिकांनी केली पाण्यासाठी ओरड



बीडः पालकमंत्री अजित पवार हे दि.२ एप्रील रोजी बीड दौऱ्यावर आले होते. त्यांनी सकाळी सकाळी राष्ट्रवादीभवन येथे जनता दरबार घेतला. यावेळी बीड शहरातील नागरिकांनी जनता दरबारला चांगला प्रतिसाद दिला. दरम्यान, यावेळी आम्हाला किमान चार दिवसाला पाणी द्या, अशी अपेक्षाही व्यक्त केली.

राष्ट्रवादी भवन येथील जनता दरबारला राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, राष्ट्रवादीचे जेष्ठ नेते बबनराव गवते यांच्यासह पक्षाचे विविध आजी-माजी पदाधिकारी उपस्थित होते. उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार हे सकाळी ९ वाजता राष्ट्रवादी भवन येथे दाखल झाले होते. यानंतर अवघ्या काही मिनीटात राष्ट्रवादी कार्यालयाचा बैठक हॉल नागरिकांनी भरून गेला होता. पालकमंत्रीपद अजित पवार यांच्याकडे आल्यापासून शहरातील स्वच्छतेचे काम सुरू झालेले आहे. दरम्यान, या कामाला अजून गती देण्याची मागणी नागरिकांनी केली. याच बरोबर सर्वाधिक प्रश्न आले ते बीड शहरातील वीस-बावीस दिवसाला येणाऱ्या पाण्याचे. त्यावेळी पालकमंत्री अजित पवार यांनी पाणी प्रश्न सोडविण्यासाठी काय काय करता येईल, याचा मी लवकरच आढावा घेतो आणि हा प्रश्न कायमचा मार्गी कसा लावता येईल, त्यासाठी प्रयत्न करतो, असे सांगितले. या वेळी ग्रामीण भागातून बळीराम गवते यांनी आयोजीत केलेल्या युवा संवाद कार्यक्रमासाठी आलेल्या कार्यकर्त्यांनीही जनता दरबारमध्ये सहभाग नोंदवून ग्रामीण भागातील प्रश्न मांडले. यात विज आणि पाणी पुरवठ्यासह शेत रस्त्यांचे विषय जास्तीच्या संख्येने होते. यावेळी शहरासह ग्रामीण भागातील नागरिक, पक्षाचे कार्यकर्ते, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिजाऊ रथयात्रा 6-एप्रिल रोजी लोह्यात : स्वागताची जय्यत तयारी

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड-लोहा : मराठा सेवा संघाच्या वतीने १८- मार्च ते १-मे दरम्यान महाराष्ट्रभर मराठा जोडो अभियान हे ब्रीद घेऊन जिजाऊ रथयात्रा फिरणार आहे.नांदेड मध्ये ही रथयात्रा ५- एप्रिल रोजी दुपारपासुन ७-एप्रिल दुपारपर्यंत शहरासह विविध तालुक्यात फिरणार आहे.तर ६-एप्रिल रोजी लोहा येथे छत्रपती शिवाजी महाराज चौकात मराठा सेवा संघ संभाजी ब्रिगेड जिजाऊ ब्रिगेड व ३३ कक्षाच्या वतीने स्वागताची जय्यत तयारी करण्यात आली आहे.दुपारी १२ वाजता ही रथ यात्रा लोहा येथे येणार आहे. मराठा सेवा संघ महाराष्ट्रातच नव्हे जगभरात जिजाऊ,शिव,शाहु,फुले,आंबेकर विचार जनमाणसात रूजविण्याचे काम केले आहे. प्रबोधनाच्या माध्यमातुन अनेक लेखक,वक्ते,शाहीर, किर्तनकार निर्माण केले मराठा बहुजन समाजाला विविध विषयांवर सभा, कॉर्नर बैठकांच्या माध्यमातुन चर्चा करण्यासाठी आपापसातील संवाद वाढविण्यासाठी ही रथयात्रा महत्वाची ठरणार आहे.१८- मार्च रोजी शहाजी महाराज जयंती दिवशी भोसले गढी वेरूळ येथुन निघुन १- मे रोजी कामगार दिन व महाराष्ट्र दिनानिमित्त पुणे




लालमहल येथे समारोप होणार आहे.ही रथयात्रा नांदेड जिल्ह्यात शनिवार ५-एप्रिल रोजी दुपारी वसमत मार्गे,आलेगाव,निळा,तळणी मार्गे नांदेड शहरात येईल व मुक्काम असेल ६- एप्रिल रोजी नांदेड शहरातुन गुरूद्वारा, जिजाऊ सृष्टी सिडको तर दुपारी १२ वाजता लोहा येथे छत्रपती शिवाजी महाराज चौकात रथयात्रेच्या स्वागतासाठी मोठ्या संख्येने समाज बांधवांनी या रथयात्रेत सहभागी होण्याचे आवाहन संभाजी ब्रिगेड चे जिह्लाध्यक्ष सुभाष पाटील कोह्ले मराठा सेवा संघाचे बळीराम पवार, नामदेवराव कुट्टे, ,विठ्ठलभाऊ चव्हाण, हरिभाऊ चव्हाण मराठा सेवा संघ लोहा तालुकाध्यक्ष शाम नळगे प्रसिद्धी प्रमुख बालाजी पाटील सिरसाट,सतिश चव्हाण मुकदम अशोक कदम,माधव पवार, सुरेश मोरे अंकुश कोह्ले लोहा तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर शिंदे कंधार तालुकाध्यक्ष नितीन कोकाटे किशनराव मोरे संजय जाधव परमेश्वर खोसे यांच्यासह मराठा सेवा संघ जिजाऊ ब्रिगेड, संभाजी ब्रिगेड व ३३ कक्षाच्या वतीने करण्यात आले आहे.महाराष्ट्रभर फिरणाऱ्या या जिजाऊ रथयात्रेतुन नक्कीच सर्वच चळवळींना बळ मिळेल व ऊर्जा मिळेल.

# पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केला किनवट येथील सेटट्राइब आयटी कंपनीचा सन्मान

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड-किनवट : नांदेड शहर उदयोन्मुख शैक्षणिक हब म्हणून पुढे येत असताना सक्रिय पोलीस दल विद्यार्थ्यांच्या व नागरिकांच्या सुरक्षिततेमध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडत आहे. नांदेड पोलिसांचे अद्ययावत संकेतस्थळ नागरिकांना पोलीस विभागासोबत सहज सोप्या पद्धतीने जोडण्याचे काम करेल. कृत्रिम बुद्धिमत्ता सारख्या अद्ययावत तंत्रज्ञानाने सज्ज अशी सुविधा नांदेड पोलीस नागरिकांना उपलब्ध करून देणार आहेत, ही कौतुकाची बाब आहे. त्यातच आपल्याच जिल्ह्यातील किनवट सारख्या दुर्गम भागात कार्यरत सेटट्राईब ह्या आयटी कंपनीने संकेतस्थळाचे अद्ययावतीकरण केले आहे, ही विशेष बाब



आहे, असे प्रतिपादन पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केले.अत्यल्प वेळेमध्ये नांदेड जिल्हा पोलीस दलाच्या संकेतस्थळाचे नूतनीकरण व अद्ययावतीकरण केल्याबद्दल पोलीस अधिक्षक कार्यालयाद्वारे सेटट्राईबचा गौरव करण्यात आला. यावेळी पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार, अप्पर पोलीस अधिक्षक सुरज गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी (गृह) अश्विनी जगताप, सायबर पोलीस निरीक्षक धिरज चव्हाण व सायबर पोलीस उप निरीक्षक मारुती चव्हाण ह्यांच्या प्रमुख उपस्थितीत सदर कार्यक्रम पार पडला. सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सेटट्राईबला गौरवण्यात आले. सेटट्राईबच्या वतीने शहेबाज खान ह्यांनी सन्मान स्वीकारला.नांदेड पोलीस दलासोबत काम करणे तसेच तंत्रज्ञानधरित सोल्यूशन्स उपलब्ध करुन देणे ही सेटट्राईबसाठी मोठी उपलब्धी असल्याचे सेटट्राईबचे संचालक सारंग वाकोडीकर म्हणाले. ह्यापूर्वीही कोरोना काळात सेटट्राईबने महिला सशक्तीकरण, सायबर अवेअरनेस, संवाद उपक्रमात सहभाग नोंदवला होता. किनवट उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाच्या वतीने सेटट्राईबला सन्मानित करण्यात आले होते.

# सार्वजनिक रस्ता अडवण्यात ग्रामसेवकाचा हात ?

तालुक्यातील भाटवगाव नवीन वसाहत येथील सार्वजनिक रस्तावर पत्र्याचे शेड उभारून सार्वजनिक रस्ता अडवून शाळेतील विद्यार्थी विद्यार्थीनी सह रहिवासी यांना रहदारीस मज्जाव करण्यात ग्रामसेवक यांचाच हात आहे तो रस्ता पुर्ववत चालू करून द्यावा या मागणीसाठी आज पंचायत समिती कार्यालय समोर सामाजिक कार्यकर्ते सुरेश साळवे व रमेश साळवे हे आमरण उपोषणाला बसणार आहेत या विषय सविस्तर माहिती अशी की, तालुक्यातील भाटवगाव ग्रामपंचायत अंतर्गत व माजलगाव शहरा जवळ असलेल्या गट नंबर १३८ मध्ये चंद्रशेखर साखरे व उत्तम राठोड यांच्या मधून जाणार रस्ता हा प्लॉट दाखवून खरेदी विक्री केला आहे तो प्लॉट ग्रामसेवक चव्हाण महाराज यांच्या पुतणे कमलेश लालासाहेब चव्हाण यांच्या नावाने आहे व त्या प्लॉट वर ग्रामसेवक यांच्या संमतीने इतर व्यक्तीने पत्र्याचे शेड उभारण्यास ग्रामसेवकानेच हात भार लावून सार्वजनिक रस्ता अडवून कायदा व सुव्यवस्था चा प्रश्न निर्माण केला

# अर्जुन अर्बन को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड केज बँकेच्या अध्यक्षपदी संदीप भैया इंगळे यांची तर उपाध्यक्षपदी सोनवाणे रामदासअंबादास बिनविरोध निवड




--------केज/ प्रतिनीधीः-केज तालुक्यातील आल्पवधित नावलौकिक मिळिवलेली अर्जुन अर्बन को-ऑपरेटिव सोसायटी लिमिटेड केज बँकेच्या अध्यक्षपदी संदीप (भैया) इंगळे यांची तर उपाध्यक्षपदी सोनवाणे रामदास अंबादास बिनविरोध निवड करण्यात आली,या बाबद सविस्तर माहिती अशी की केज शहरात अर्जुन को - ऑप सोसायटी लि यांची सर्व साधारण सभा झाली या मध्ये अर्जुन अर्बन को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड केज बँकेच्या अध्यक्षपदी संदीप (भैया) इंगळे यांची बिनविरोध निवड करण्यात आली या निवडीबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे

# शालांत प्रमाणपत्र (सनद ) हरवली

माझी बालाजी शामराव भुरके या नावाची इयत्ता दहावी पास माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा-गुणपत्र (सनद) किनवट ते नांदेड प्रवास करत असतांना हरवली आहे. सापडल्यास संपर्क करणे

**संपर्क -**
**बालाजी शामराव भुरके**
**रा.थारा ता.किनवट जि.नांदेड**
**मो.9823845012**

# व्हाईस ऑफ मीडियाची केज तालुका कार्यकारिणी जाहीर

## तालुकाध्यक्षपदी रामदास साबळे, कार्याध्यक्षपदी डॉ.हनुमंत सौदागर







केज (प्रतिनिधी)दि.३ : व्हाईस ऑफ मीडियाच्या केज तालुकाध्यक्षपदी पत्रकार रामदास साबळे तर कार्याध्यक्षपदी पत्रकार डॉ.हनुमंत सौदागर यांची गुरुवारी (दि.३) बिनविरोध निवड करण्यात आली आहे.व्हाईस ऑफ मीडियाच्या तालुका कार्यकारिणीच्या नूतन पदाधिकारी निवडीची बैठक ज्येष्ठ पत्रकार मधुकर सिरसाट यांच्या अध्यक्षतेखाली केज येथील व्हाईस ऑफ मीडियाच्या कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत व्हाईस ऑफ मीडियाच्या नूतन पदाधिकाऱ्यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. या बैठकीस व्हाईस ऑफ मीडियाचे सचिव दीपक नाईकवाडे, कोषाध्यक्ष संतोष गालफाडे, प्रसिद्धी प्रमुख दिनकर राऊत, संघटक मनोराम पवार, किशोर पत्रावळे आदींसह संघटनेचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. यावेळी नूतन तालुकाध्यक्ष, कार्याध्यक्ष यांचा सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. व्हाईस ऑफ मीडियाच्या नूतन पदाधिकाऱ्यांच्या निवडीचे सर्वस्तरातून स्वागत होत आहे.



जिल्ह्याचे भूमिपुत्र व गोरगरिबांचे देवदूत म्हणून परिचित असलेल्या डॉ.ओमप्रकाश शेटे यांची नुकतीच आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीच्या अध्यक्ष पदी निवड झाली. डॉ.शेटे यांच्याकडे आरोग्य क्षेत्रातील महत्वाची जबाबदारी आल्यामुळे निश्चितच जनतेला त्याचा फायदा होणार आहे.

# खर्डा येथील श्री छत्रपती शिक्षण संकुलात निरज पवार यांचा सन्मान.

खर्डा ( प्रतिनिधी ) दिनांक 3 जामखेड तालुक्यातील ऐतिहासिक खर्डा येथील श्री छत्रपती शिक्षण संकुलात महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी नीरज दत्तराज पवार यांचा गुरुवार दिनांक 3 एप्रिल 2025 रोजी सन्मान करण्यात आला. श्री छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळाचे सचिव डॉ. महेश गोलेकर, पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब शिंदे यांच्या हस्ते नीरज पवार यांना शाल, श्रीफळ, व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी बोलताना डॉ महेश गोलेकर म्हणाले की,नीरज पवार हा कॉलेज चा माजी विद्यार्थी असून त्याने बी.कॉम नंतर आपले करियर निवडताना एल.आय.सी. इन्शुरन्स कंपनी मध्ये काम करण्याची संधी प्राप्त केली.त्यासाठी भारत सरकारच्या आयआरडीआय ची परीक्षा देवून तो पास झाला.टाटा कंपनीतर्फे त्याला या क्षेत्रात काम करण्याची मोठी संधी मिळाली असून त्याचा सन्मान करणे खूप मोठी गोष्ट असल्याचे त्यांनी सांगितले.त्यामुळेच नीरज चा सन्मान चार भिंतीच्या आत न करता सर्व विद्यार्थ्या समोर केला.कारण यातून नवीन मुलांना प्रेरणा मिळते.असे त्यांनी सांगितले.



यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व अध्यक्ष बाळासाहेब शिंदे यांनी विद्यार्थ्यांनी आपले करियर निवडताना कोणती काळजी घ्यायची,जीवनात आलेले शाळा,कॉलेज चे अनुभव आपल्या दर्जेदार शैलीत सांगितले. या कार्यक्रमासाठी डॉ.महेश गोलेकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रसेन आवरे, पत्रकार दत्तराज पवार,बाळासाहेब शिंदे, प्रा.महेश बजगुडे,शिंदे फौजी, प्रा.जगताप सर, प्रा. लक्ष्मण घोडके, बारटक्के सर, तनपुरे सर आदी हजर होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. सतीश शिंदे यांनी तर आभार प्रा. धनंजय जवळेकर सर यांनी केले. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राध्यापक ,शिक्षक वृंद व विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हमालाचा पोरगा झाला फौजदार.. राजेश सुरेखा ईश्वर निमळ यांची पोलीस उपनिरीक्षक पदी निवड आई मोलमजुरी करायची, भाऊ देखील हमाल च


पाटोदा प्रतिनिधी : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेतून पिट्टी गावचे सुपुत्र ची. निर्मळ राजेश सुरेखा ईश्वर यांची महाराष्ट्र राज्य पोलीस उपनिरीक्षक पदी निवड झाल्याने पिट्टी गावासह पंचकृषी मध्ये आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

राजेश चे प्राथमिक शिक्षण जिह्ला परिषद शाळा, खोमणेवस्ती इथे होऊन माध्यमिक शिक्षण जवाहर विद्यामंदिर निरगुडी येथून पूर्ण झाले. उच्च शिक्षणासाठी सौ. के. एस. के महाविद्यालयात प्रवेश घेऊन बी.ए. राज्यशास्त्र विषयात पदवी घेऊन लोकसेवा आयोगाच्या परीक्षांची तयारी सुरू केली. त्याने त्याची संपूर्ण तयारी अगदी बीड मध्ये राहूनच कोणत्याही क्लासेस शिवाय केली. कारण क्लासेस लावायला मिळतील अशी स्थिती नव्हती. आणि या स्पर्धेच्या जगात त्याने खूप उंच भरारी घेतली.अगदी गेल्याच महिन्यात त्याची महसूल सहायक पदी निवड झाली आणि लगेच पोलीस उपनिरीक्षक म्हणून निवड झाल्याने परिवारासह गावकऱ्यांच्या आनंदाला उधाण आले. यातूनच गावकऱ्यांनी भव्य



मिरवणूक काढून त्याचे जंगी स्वागत केले. शेकडो मंडळी यावेळी उपस्थित राहून, त्याच्या यशाचे कौतुक करून, आपल्या भावी पिढ्या घडवण्यासाठी मुलांना उदाहरण देऊ लागले.

## भयानक संघर्षमय प्रवास:



राजेश चे वडील ईश्वर सुखदेव निर्मळ यांच्या विषयी बोलायचे झाले तर अगदी अंगठा साक्षर माणूस. गेल्या ३० वर्षांपासून साखर कारखान्यात हमाली करतात. अगदी तुटपुंज्या प्रमाणात मजुरी मिळत असायची. कधी या साखर कारखान्यात तर कधी दुसरीकडे असा त्यांचा प्रवास असायचा. मध्यंतरी खूप अडचणी असल्याने त्यांनी ३ वर्षं ऊस तोडण्याचे काम देखील केले. शिक्षणाचा गंध देखील नसलेला हा देव माणूस लेकराला शिकवायच्या बाबतीत मात्र खूप प्रेरणादायी असायचा. ईश्वर निर्मळ यांना अक्षर ओळख देखील नसल्याने त्यांची एस टी बस मध्ये फिरताना अडचण निर्माण व्हायची, दुसऱ्यांना बस ची पाटी विचारताना खूप अपराधी भावना वाटायची अस त्यांनी बोलुन दाखवलं. निकाल आला तेव्हा ते गेवराई तालुक्यातील गढी फाट्यावरील साखर कारखान्यात पोते उचलत होते, निकाल कळताच त्यांच्या डोळ्यातून आनंदाश्रु ढळाळून वाहत होते. समस्त गाव या अशिक्षित पण कायम प्रामाणिक बापाची स्तुती करत आहे.

राजेश ची आई श्रीमती सुरेखा ईश्वर निर्मळ त्यांना असलेली शेती सांभाळायचं काम करून लोकांच्या शेतात मोल मजूरी करायची. राजेश देखील आईला नेहमी शेतीत मदत करत असताना पाहिलेलं गावकरी सांगत आहेत. आणि शेती जर बघितली तर अगदी नसलेली बरी अशी त्याची अवस्था, शेती 2 एकर तीदेखील ९ जागेवर वरतून पाण्याचा अभाव. अगदी घराकडे जायला रस्ता नसलेल्या पोराने आज गावातून पहिलाच फौजदार होऊन आई बापाची मान उंचावल्याने गावात कौतुक वाटत आहे.

राजेशला प्रकाश नावाचा एक मोठा भाऊ आहे, त्याने बारावी पर्यंत शिक्षण घेतले परंतु घरची परिस्थिती शिकवण्या लायक नसल्याने शेवटच्या पेपर संपल्यावर दुसऱ्याच दिवशी त्याने साखर कारखान्यात हमाली करायला सुरू केली . राजेश मधील हुशारी हेरून त्याने, कायम त्याला सांगत राहिला की माझ्याच्याने शिकता आले नाही किमान तू तरी शिक. अशा या बिकट स्थितीतून राजेश ने कुटुंबासह संपूर्ण गावची मान उंचावल्याने चोहो बाजूंनी त्यावर कौतुकाची थाप पडत आहे.

अशाप्रकारे फौजदार राजेश सुरेखा ईश्वर निर्मळ निर्मळ यांचा भयानक प्रवास थक्क करणारा असल्याने संपूर्ण ग्रामस्थांच्या वतीने त्यांचे खूप खूप अभिनंदन तसेच राजेश च्या पुढील वाटचालीस खूप खूप शुभेच्छा.

# सार्वजनिक बांधकाम विभागातील शेख शफीभाऊ यांचा लिंबागणेश ग्रामपंचायत मार्फत सेवानिवृत्ती निमित्त सत्कार समारंभ



लिंबागणेश:- ( दि.०३) बीड तालुक्यातील लिंबागणेशचे भुमिपुत्र शेख शफीभाऊ शेख अब्दुल हे नियत वयोमानानुसार पाटोदा सार्वजनिक बांधकाम विभाग येथुन निवृत्त झाले असुन आज दि.०३ गुरुवार रोजी ग्रामपंचायत कार्यालयात ग्रामपंचायतीच्या वतीने शाल , श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन हृद्य सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच बालासाहेब जाधव होते.कार्यक्रमाची प्रस्तावना व सुत्रसंचलन भिम टायगर ग्रुप जिह्लाध्यक्ष रविंद्र निर्मळ यांनी केले. शेख शफीभाऊ यांचे वर्गमित्र निवृत्त अभियंता गणपत तागड यांनी तसेच पत्रकार हरीओम क्षीरसागर,माजी सरपंच बाळासाहेब मुळे, ग्रामपंचायत सदस्य शेख समीर, रमेश गायकवाड यांनी आपले मनोगत व्यक्त केले. डॉ.गणेश ढवळे यांनी शेख शफीभाऊ यांनी केलेल्या सेवेचा व त्यांच्या कार्याचा गुणगौरव करीत असताना त्यांच्या सेवानिवृत्ती नंतरचा काळ सुखी, समृद्धी, आनंदाने जावो व त्यांना निरोगी दीर्घायुष्य लाभो यासाठी शुभेच्छा दिल्या.सत्कारमूर्ती शेख शफीभाऊ यांनी सत्काराला उत्तर देताना सार्वजनिक बांधकाम विभाग नांदेड जिल्ह्यातील धर्माबाद तालुक्यातील भोकरदन सार्वजनिक बांधकाम उपविभाग याठिकाणी २६ वर्षे सेवा केल्यानंतर १५ वर्षे बीड जिल्ह्यातील पाटोदा याठिकाणी ३१ मार्च रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्ती झाल्याचे सांगताना शासकीय नोकरी करत असताना गावच्या मातीची ओढ , त्यांना आलेले अनुभव कथन केले. ग्रामपंचायत मार्फत करण्यात आलेल्या सत्कार समारंभाबद्दल सरपंच आणि ग्रामपंचायत सदस्यांचे आभार मानले. यावेळी शुभेच्छा देण्यासाठी माजी सरपंच राजेभाऊ गिरे, संदिप मंडलिक, बाळकृष्ण थोरात,ग्रामपंचायत सदस्य श्रीहरी निर्मळ , दामोदर थोरात, महादेव कुदळे, अशोक जाधव, अँड . गणेश वाणी,संतोष भोसले, अशोक वाणी,दादा गायकवाड, शेख खाजु,सय्यद रफिक,शेख अकबर मिस्त्री, आरूण ढवळे, राजेंद्र ढास ,अमोल जाधव ,राजेभाऊ आगवान आदि ग्रामस्थांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर
मो.नं.८१८०९२७५७२

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार ४ एप्रिल २०२५
https://lokaarambh.com



# लोकसभेत वक्फ दुरुस्ती विधेयकाला मंजुरी

## मध्यरात्री २ वाजता लोकसभेत मणिपूरच्या विषयावर चर्चा सुरु

नवी दिल्ली : ऐतिहासिक वक्फ दुरुस्ती विधेयकाला बुधवारी मध्यरात्री लोकसभेने १२ तासांच्या वादळी चर्चेनंतर मध्यरात्री १.५५ वाजता मंजुरी दिली. विधेयकाच्या बाजूने २८८, तर विरोधात २३२ मते पडली. बुधवारी दुपारी १२ वाजता सुरू झालेली चर्चा मध्यरात्री १२.०५ वाजेपर्यंत चालली. पूर्वनियोजित कार्यक्रमानुसार रात्री ८ वाजता मतदान घेण्यात येणार होते; परंतु नंतर चर्चेची वेळ वाढवण्यात आली. मध्यरात्री चर्चा पूर्ण झाल्यानंतर मतदान घेण्याचे ठरविण्यात आले. लोकसभेत हे विधेयक मंजूर झाल्यानंतर आता राज्यसभेत मांडले जाईल. दरम्यान, मध्यरात्री २ वाजता लोकसभेत मणिपूरच्या विषयावर चर्चा सुरू झाली. तृणमूल कॉंग्रेसचे सौगत रॉय यांच्या प्रस्तावावर सर्वप्रथम मतदान घेण्यात आले. त्यानंतर विरोधकांनी सुचवलेल्या विविध दुरुस्त्यांवर आवाजी मतदानाने कल घेण्यात आला. वक्फवर गैरमुस्लिमांची नियुक्ती रोखावी का, यावर मतदान घेण्यात आले. विधेयकाच्या बाजूने १९६ व विरोधात २४३ मते पडली. येथे एकूण



४३९ मते पडली. मध्यरात्री १.०४ वाजता हे मतदान घेतले. तत्पूर्वी, देशभरात प्रखर विरोधाचा सामना करावा लागत असलेले वादग्रस्त वक्फ सुधारणा विधेयक, २०२४ हे केंद्रीय अल्पसंख्याक मंत्री किरेन रिजिजू यांनी बुधवारी लोकसभेत मांडले होते. या विधेयकावर सभागृहात झालेल्या १२ तासांच्या चर्चेत कॉंग्रेस, समाजवादी पक्षासह आणखी (पान १ वरून) काही पक्षांनी अतिशय कडक टीका केली. चर्चेला सुरूवात करताना रिजिजू म्हणाले की, या विधेयकाचा धर्माशी नव्हे तर मालमत्तांशी संबंध आहे. तर कॉंग्रेसचे खासदार गौरव गोगोई म्हणाले की, राज्यघटनेच्या मूलभूत रचनेवर घाला घालण्याकरिता तसेच अल्पसंख्याकांना बदनाम करण्यासाठी हे विधेयक आणण्यात आले असून, त्याला इंडिया आघाडीचा विरोध आहे. रिजिजू म्हणाले, वक्फ मालमत्तांची पारदर्शक कारभाराच्या माध्यमातून देखभाल व्हावी, यात तंत्रज्ञानाचा सहभाग वाढावा म्हणून हे सुधारणा विधेयक तयार करण्यात आले आहे. अखिलेश म्हणाले- रिजिजू यांनी सांगावे

### केसी वेणुगोपाल म्हणाले- धर्माच्या नावाखाली भारत मातेचे विभाजन केले जात आहे

कॉंग्रेस खासदार केसी वेणुगोपाल म्हणाले इथे धर्माच्या नावाखाली भारत मातेचे विभाजन केले जात आहे. रिजिजूजी, या विधेयकात तुम्ही गैर मुस्लिमांनाही सहभागी करून घेत आहात. वैष्णोदेवी मंदिर कायद्यात असे म्हटले आहे की उपराज्यपाल हे अध्यक्ष असतील आणि जर ते हिंदू नसतील तर ते एखाद्याला नामनिर्देशित करू शकतात. मी याचे समर्थन करू शकतो. तुम्ही वक्फ बोर्डाशी भेदभाव का करत आहात? वक्फ बोर्ड देखील धार्मिक आहे. केरळमध्ये, एक आमदार देवस्थानम बोर्डावर कोणालाही नामांकित करू शकतो, तो आमदार हिंदू असेल. मुस्लिम राहणार नाही. देवस्थानम बोर्डाचा सदस्य निवडण्याचा अधिकार कोणत्याही मुस्लिम किंवा ख्रिश्चन आमदाराला नाही.

# स्थानिक स्वराज्य संस्थांनच्या निवडणुकीत शिवसेनेचा भगवा फडकविण्यासाठी पूर्ण ताकदीने कामाला लागा- बाप्पूसाहेब मोरे

## शिवसेना बीड जिल्हा आढावा बैठक तथा सदस्य नोंदणी अभियानाचा शुभारंभ!

बीड, प्रतिनिधी- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका गेल्या काही वर्षांपासून रखडल्या होत्या. विधानसभा निवडणुकीनंतर आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे बिगुल वाजणार आहे. राज्यात शिवसेनेला मिळालेल्या अफाट यशानंतर बीड जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीम ध्येही शिवसेनेचा भगवा फडकवण्यासाठी शिवसैनिकांनो पूर्ण ताकदीने कामाला लागा. शिवसेना सदस्य नोंदणीचे फॉर्म जास्त संख्येने भरून शिवसेना पक्ष संघटन मजबूत करा असे शिवसेना बीड जिल्हा संपर्क प्रमुख बाप्पुसाहेब मोरे यांनी शिवसेना बीड जिल्हा आढावा बैठक तथा सदस्य नोंदणी अभियानाचा शुभारंभा प्रसंगी आपले मत व्यक्त केले. शिवसेना मुख्य नेते उपमुख्यमंत्री ना. एकनाथजीशिंदे साहेब तथा खा. डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांच्या आदेशानुसार तसेच शिवसेना सचिव संजय मोरे साहेब, शिवसेना उपनेते व मराठवाडा संपर्कप्रमुख अर्जुनभाऊ खोतकर साहेब आणि मराठवाडा विभागीय सचिव अशोक पटवर्धन साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्हा संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन मुळूक, स्वप्नील गलधर यांच्या प्रमुख उपस्थितीत काल दि. ३ एप्रिल २०२५ रोजी दु. १२.०० वाजताच्या दरम्यान माळीवेस चौक येथील हनुमान मंदिर सभागृहात शिवसेनेच्या बीड जिल्ह्यातील महत्त्वाच्या पदाधिकाऱ्यांची



आढावा बैठक आयोजित संपन्न झाली. या बैठकीत मागील सदस्य नोंदणीचा आढावा घेण्यात आला. तसेच नवीन सदस्य नोंदणीचा शुभारंभ शिवसेना, महिला आघाडी, युवासेना शेतकरीसेना, ओबीसी सेना, अनुसूचित जाती-जमाती सेनेचे आजी-माजी पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, शाखाप्रमुख व उपस्थित शिवसैनिकांच्या शुभहस्ते करण्यात आला. आपल्या शिवसेना पक्षाचे संघटन मजबूत करण्यासाठी एकनाथजी शिंदे साहेब यांची बीड जिल्ह्यातून ताकद वाढविण्यासाठी तर यंदाच्या स्थानिक स्वराज्य निवडणुकीत शिवसेनेचा भगवा फडकविण्यासाठी बीड जिल्ह्यातून सर्वाधिक शिवसेना सदस्य नोंदणी फॉर्म भरण्याची जिम्मेदारी आपल्या सर्व आजी-माजी पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, शाखाप्रमुख व शिवसैनिकांच्या खांद्यावर असून आपण सर्व प्राधान्याने पुढाकार घेऊन सदस्य नोंदणीच्या अभियानात आपले सर्वोपरी योगदान द्यावे असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन मुळूक यांनी आपल्या भाषणात केले. या बैठकीचे सूत्रसंचलन प्रतिक कांबळे यांनी केले तर आभार प्रदर्शन शिवसेना उप जिल्हाप्रमुख संतोष जाधव यांनी केले.

# पत्रकार धनंजय आरबुने यांना वास्तववादी लिखाणासाठी पुरस्कार प्रदान



सिंदखेड राजा हे परगणा लखोजीराव जाधव यांच्या राजवाड्यासाठी प्रसिद्ध आहे. हा राजवाडा सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धात जिजाबाईंचे वडील लखुजी जाधव यांनी बांधला होता . जिजाबाईंचा जन्म १२ जानेवारी १५९८ रोजी याच ठिकाणी झाला.ख्यातनाम बहुजन साहित्य संघ, चिखलीच्या वतीने मातृतीर्थ सिंदखेडराजा नगरीतील राजे लखुजी जाधव साहित्य नगरी, येथे संपन्न झालेल्या साहित्य संमेलनात परळी येथील ज्येष्ठ पत्रकार धनंजय आरबुने यांना त्यांच्या वास्तववादी व सामाजिक लिखाणा बद्दल पुरस्कार प्रदान करण्यात आला,राजमाता जिजाऊंच्या जन्मस्थळावर प्रांत तथा जिल्ह्यातून आवजू न उपस्थित झालेल्या साहित्यिक, कवी,आणि लेखक व रसिक माता भगिनींना सर्व मान्यवरांची मोठी उपस्थिती होती. या साहित्य संमेलनात आपल्या वैविध्यपूर्ण लेखनाने वास्तववादी विषय मांडू न सामाजिक जागृती करणारे परळी येथील जेष्ठ पत्रकार धनंजय आरबुने यांना त्यांच्या लिखाणाबद्दल पुरस्कार प्रदान करण्यात आला. या निवडीचे सर्व स्तरातून स्वागत होत असून विविध साहित्यिक, लेखक, पत्रकार यांनी त्यांना फोन करून तसेच प्रत्यक्ष भेटून शुभेच्छा दिल्या

# जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्रावर प्रशिक्षण घेण्यास सहभागी होणे बाबत आवाहन

बीड जिल्ह्यात विविध खेळांचा प्रचार व प्रसार होऊन जिल्ह्यातील खेळाडू राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर सहभागी व्हावेत हा उद्देश ठेऊन जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड येथे राज्य शासनामार्फत नियुक्त तज्ञ क्रीडा मार्गदर्शक यांचे मार्फत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड येथे जिल्हा परिषद कन्या प्रशाला, छत्रपती शिवाजी महाराज चौक, बीड, जिल्हा क्रीडा संकुल, बीड, येथे सॉफ्टबॉल, बेसबॉल व मैदानी खेळाचे प्रशिक्षण केंद्र नियमीत सुरू आहे.जिल्हा परिषद कन्या प्रशाळा, छत्रपती शिवाजी महाराज चौक, बीड येथे (सकाळी ०७.०० ते ९.०० वाजेपर्यंत आणि जिल्हा क्रीडा संकुल मैदान, बीड येथे दुपारी ०४.३० ते ०७.०० वाजेपर्यंत सॉफ्टबॉल खेळाचे तज्ञ क्रीडा मार्गदर्शक सतीश राठोड, बेसबॉल खेळाचे तज्ञ क्रीडा मार्गदर्शक रेवननाथ शेलार व मैदानी खेळाचे तज्ञ क्रीडा मार्गदर्शक अविनाश पाटील हे प्रशिक्षण देत आहेत.बीड शहर व जिल्ह्यातील जास्तीत जास्त खेळाडू 'नी सदर प्रशिक्षण केंद्राचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी, अरविंद विद्यागर यांनी केले आहे. अधिकच्या माहितीसाठी क्रीडा मार्गदर्शक सतीश राठोड (मो. ९९२३०१९३५३), क्रीडा मार्गदर्शक रेवननाथ शेलार (मो. ९०७५४७६७९१) व क्रीडा मार्गदर्शक अविनाश पाटील (मो. ९६२३७८११२१) यांच्याशी संपर्क साधावा. असे जिल्हा क्रीडा अधिकारी, अरविंद विद्यागर यांचे वतीने कळविण्यात येत आहे.

# आष्टी येथे विश्रामग्रह ते तहसिल कार्यालयावर धडकणार मोर्चा

आष्टी |प्रतिनिधी बूद्धगया येथील बुद्धविहार बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे व बौद्ध युवक विकास बनसोडे यांच्या मारेकऱ्यांना कठोर शिक्षा व्हावी या मागणीसाठी शुक्रवार दिनांक ०४ एप्रिल रोजी होणाऱ्या भव्यदिव्य मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन आष्टी तालुक्यातील समस्त भीमसैनिकांच्या वतीने करण्यात आले आहे.बुद्धगया येथील



महाबुद्धविहार हे फक्त बौद्धांच्याच ताब्यात देण्यात यावे या मागणीसाठी राज्यातच नाही तर देशभर आंदोलने सुरू आहेत.अनेक वर्षाची ही मागणी असून आता या मागणीने उद्रेक स्वरुप निर्माण केले आहे.अनेक ठिकाणी आंबेडकरी चळवळीतील नेत्यांनी लक्ष घालुन मागणी लावून धरली आहे.त्याचअनुषंगाने आष्टी तालुक्यातील समस्त भीमसैनिकांच्या वतीने देखील या मागणीचा आवाज बुलंद करण्यासाठी रस्त्यावर उतरणार आहेत.तसेच काही दिवसांपूर्वी विकास बनसोडे यांची देखील जातीय द्वेषातुन हत्या झाली असून त्या हत्येतील आरोपींना कठोर कारवाई करण्यात यावी या मागणीसाठी देखील शुक्रवार दिनांक ०४ एप्रिल रोजी सकाळी साडे अकरा वाजता मोर्चाचे आयोजन केले असून आष्टी तालुक्यातील समस्त आंबेडकरी प्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन केले आहे. आज उपविभागीय पोलिस अधिकारी साहेब यांना त्या संदर्भात निवेदन देखील देण्यात आले आहे.यावेळी संदिप जाधव, कुणाल निकाळजे, दिपक गरुड,सुभाष निकाळजे,राहुल निकाळजे,संजय खंडागळे, नितीन निकाळजे, अविनाश भा. निकाळजे,दिपक वाल्हेकर, समीर शिरसाट, अविनाश निकाळजे,मुकेश निकाळजे,आदी सर्व भिमसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# केज पोलिसाच्या आशीर्वादाने केजची तहसील अवैध धंदे व अतिक्रमणाच्या विळारव्यात

के ज / प्र ति नि धी : - के ज पोलिसांकडून अवैद्य प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांना केज पोलीसांनी मुक्त मुभा दिली आहे का? असा सवाल नागरिकांतून उपस्थित केला जात आहे. अवैद्य धंदे व अतिक्रमणाच्या विळाख्यात केजची तहसील झाकाळली असल्याचे दिसून येत अशी चर्चा जनसामान्यातून नागरीकातुन ऐकण्यास मिळत आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक ते तहसील कार्यालय परिसर व प्रवेशद्वार या ठिकाणी अवैद्य प्रवासी वाहतूक करणाऱ्या रिक्षा पार्किंगला केज पोलीस कडून मुक्त मुभा दिली असल्याचे दिसून येते व अवैद्य धंदे आणि अतिक्रमणाच्या विळाख्यात केजची तहसील झाकाळली अशी चर्चा नागरिकांतून ऐकण्यास येत आहे. ग्रामीण भागातील वयोवृद्ध, महिला, युवक-युवती नागरिक हे कामानिमित्त तहसील कार्यालय ,पंचायत समिती कार्यालय ,येथे येतात परंतु अवैध प्रवासी वाहतूक करणारे,रिक्षा पार्किंग मुळे व अतिक्रमणामुळे तहसील कार्यालय नेमके कुठे आहे ते दिसून येत नाही .त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांची तारांबळ उडत असल्याचे चित्र आहे. तहसील कार्यालयाच्या गेट समोरील रिक्षा पार्किंग आणि अतिक्रमण मुळे छत्रपती शिवाजी महाराज चौक ते तहसील कार्यालय परिसरात मेन रोडवर वाहतुकीस व रहदारीस अडथळा निर्माण होत असताना हाकेच्या अंतरावर असलेल्या केज पोलिस यावर काहिच बोलत नाहीत, आवैद प्रवासी वाहतूक करणारे इतके निर्ढावलेले आहेत, चक्क रस्त्यावर रिक्षा उभे करून रिक्षावाले अवैद्य प्रवासी वाहतूक करत आहेत परंतु सदर वाहतुकीकडे केज पोलिसाचा कानाडोळा का? असा सवाल नागरिकांतून उपस्थित केला जात आहे. तहसील कार्यालयात कामानिमित्त येणारे नागरिक व शहरातील नागरिक व विद्यार्थी रस्त्याने येजा करत असताना त्यांना नाहक त्रास होत आहे. अवैद्य प्रवासी वाहतूक करणारे रिक्षा व जीप आणि अवैद्य धंदे हे छत्रपती शिवाजी महाराज चौक ते तहसील कार्यालय परिसरात सर्रासपणे चालू असताना देखील केज तहसीलचे तहसीलदार ऊघडपणे पाहत आहेत. तहसील कार्यालयाच्या समोर उपोषण स्थळ आहे या उपोषण स्थळाच्या ठिकाणी रिक्षा पार्किंग आहे एखाद्या व्यक्तीला उपोषणाला बसायचे झाले तर या ठिकाणी उपोषणाला बसता देखील येत नाही रिक्षावाले उपोषणकर्त्याला त्या ठिकाणी बसू देत नाहीत वरून त्यांना म्हणतात आम्ही पोलीस स्टेशनला हप्ते देत आहोत असे जनसामान्यातून बोलले जात आहे. सध्या केज शहरांमध्ये श्री छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वरूप पुतळा काही दिवसापूर्वी बसवण्यात आला आहे या पुतळ्याच्या व चौकाच्या सुशोभीकरणाचे काम प्रगतीपथावर चालू आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वरूड पुतळ्यामुळे शहराच्या वैभववात भर पडली आहे परंतु अवैद्य प्रवासी वाहतुकीमुळे छत्रपती शिवाजी महाराज चौक ते तहसील कार्यालय परिसरामध्ये अडथळा निर्माण होत आहे या ठिकाणी अपघाता सारख्या दुर्घटना घडण्याची शक्यता नाकरता येत नाही. श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरात अवैद्य प्रवासी वाहतूक करणारे रिक्षाची पार्किंग व अवैद्य धंदे मुळे मोठ्या वाहनांना वळण घेता येत नाही त्यामुळे अनेक वेळा या ठिकाणी छोटे-मोठे अपघाताच्या घटना घडल्या आहेत व छत्रपती शिवाजी महाराज चौक मोठ्या वाहनांना वळण रस्ता त्यांना अडचण निर्माण होत आहेत काही वेळा तर मोठी वाहने श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक जात आहे त्यामुळे चौकाची देखील होत आहे त्यामुळे शिवप्रेमी नाराज आहेत या प्रकरणी शिवप्रेमी मोठे आंदोलन करणार आहेत अशी चर्चा ऐकण्यास येत आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com